**संशोधन पद्धती -** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम स्त्रोत विविध वृत्तपत्रात आलेले लेख त्यांचा उपयोग करण्यात आला त्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण पद्धती वापरण्यात आली.

एकोणविसाव्या शतकात भारतात स्त्रियां विषयक समस्यांची जाणीव निर्माण झाली स्त्रियांच्या समस्यांची चर्चा त्यावर उपाय सामाजिक चळवळी समाजसुधारकांचे प्रयत्न यामुळे स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा आणि तिचा स्वतःचा ही दृष्टिकोन बदलत गेला १९४७ आली भारत स्वतंत्र झाला घटनेने स्त्रियांना समान नागरिकत्वाचे अधिकार मिळाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे तळागाळातील दलित स्त्री जागृत झाली 1975 साली युनो च्या वतीने जगभर साजरे झालेले आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्ती वर्ष स्त्रियांना सहजीवनाचे डोळस देणारे ठरले स्त्रीच्या अस्तित्वाचा या झगड्या तिचे स्थान तिची प्रतिमा विचार भावना रूढी परंपरा समाज संस्कृतीचे चित्र घर ते अवकाश मोहीम पर्यंत स्त्रीच्या प्रगतीच्या खुणा या अनुषंगाने स्त्रीलिखित साहित्याचा स्वतंत्रपणे शोध घेतला जाऊ लागला स्त्री अभ्यास केंद्राने त्यास दिशा देण्याचे काम केले त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांचे जीवनदर्शन विचार मानस कधी प्रांजळपणे कधी परखडपणे परंपरांना छेद देत प्रकटलेले आढळते स्त्रीजीवनाच्या व समाजाच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाच्या स्थिती गतीचा आलेख रेखाटणारी स्त्रियांची आत्मचरित्रे स्वतंत्रपणे अभ्यासली जात आहे .

सद्यपरिस्थितीत दृश्य श्रावण माध्यमांचे वर्चस्व सर्वत्र दिसत आहे समाज माध्यमांनी वैश्विक जाळे विणले आहे चित्रपट मालिका जाहिराती सौंदर्यस्पर्धा फॅशन शो यात स्त्री चे प्रेक्षणीय उपभोग विकास विकाऊ वस्तू रूपात सादरीकरण केले जात आहे. स्त्रीयान पुढे उभी ठाकलेली आव्हाने बदलली आहे. माणूस व व्यक्ती अस्तित्वात मिळण्यासाठी केलेल्या संघर्ष पेक्षाही या आव्हानांना सामोरे जाणे अधिक कठीण ठरणार आहे अशा स्थितीत आपला सामर्थ्याची पाळेमुळे घट्ट धरुन स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी भवताल बदलण्यासाठी स्त्री आत्मचरित्रातून स्त्रियांनी स्वतः घडवलेली स्त्री प्रतिमा कदाचित दिशा दाखवणारी ठरू शकते कुटुंब संस्था सामाजिक स्त्रियांचा आत्मशोध स्त्रीयांना आलेले आत्मभान त्यांचे समूह भान जीवनसंघर्ष शी अनेकांगी दखल गांभीर्याने घेतली पाहिजे.

**जागतिक महामारी covid-19**

कोविड महासाथ हे मानव जातीवरील सर्वात मोठे संकट असल्याचे सिद्ध झाले आहे.कोविडच्या दुसऱ्या लाटेचा सर्वाधिक परिणाम स्त्रिया आणि लहान मुलांवर झालेला दिसून येतो आहे.देशात 30,000 बालके अनाथ झाली अनेक स्त्रिया विधवा झाल्या असल्याचे आकडे समोर येत आहे . केंद्र सरकार कडून किती स्त्रिया विधवा झाल्या आहेत. किंवा किती लोकांनी कोविड महासाथीत त्यांचे जोडीदार गमावले याची संपूर्ण आकडेवारी अजून समोर आलेली नाही पण आपल्या आजूबाजूला अनेकांनी आपल्या जवळच्या व्यक्तीलाअकाली गमावले असल्याची विदारकता दिसत आहे.

**कोविडमुळे विधवा झालेल्या स्त्रियांची प्राथमिक माहीत**

| क्र. | जिल्हा | कोविडमुळे विधवा झालेल्या स्त्रिया |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | २६५ |
| २ | जालना | ६१ |
| ३ | परभणी | १३४ |
| ४ | हिंगोली | ३९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | बीड | २७४ |
| ६ | नांदेड | २५४ |
| ७ | उस्मानाबाद | ९४ |
| ८ | लातूर | १७८ |
| ९ | सोलापूर | १३३ |
| १० | कोल्हापूर | १२६ |
| ११ | सांगली | २७४ |
| १२ | नागपूर | ३५० |

आपल्या देशात आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विधवा स्त्रिया सैनिकांच्या विधवा स्त्रियांचे अनुभव व त्यांचे मानवी हक्क या वर काम होत होते. आता यात कोविड मुळे अकाली पतीचे निधन झाल्यामुळे कोविड या विधवा वर्गवारी ची भर पडत आहे, मानवाच्या विकसित अवस्थेत धर्म, जात ,आर्थिक गट यामध्ये सातत्याने संघर्ष होत आला आहे, मात्र यापुढे संघर्ष धर्म, जात वगैरेच्या पल्याड जाऊन विधवा स्त्रियाचा संघर्ष असून आजची स्त्री शिक्षण घेतलेली आर्थिक आणि मानसिक दृष्ट्या ही सक्षम असून स्त्रीचा परिघ विस्तारलेला आहे. आत्तापर्यंत सगळ्या नाड्या गोष्टी पतिच्या हातात होत्या पण पतीच्या अकाली निधनानंतर सुरू होत असलेल्या नवा संघर्ष त्यांना एक विधवा म्हणून करावा लागत आहे.

१९ व्या शतकातील नवीन घटकांचा स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर मुलगामी परिणाम होत आहे . विधवा स्त्री ज्या विशिष्ट समाजव्यवस्थेत वावरते तो समाज त्यातील स्थानिक गट व आर्थिक स्तर यांनुसार तिच्या समस्या भिन्न भिन्न रुपे धारण करतात अविकसित व विकसनशील देशांत स्त्रियांना शिक्षण रोजगार कायदेशीर हक्कांची जाणीव कमी प्रमाणात असल्याने पतिनिधनामुळे विधवेचे जीवन अत्यंत कष्टप्रद बनते. भारतातील हलाखीचे जीवन जगणा-या विधवांची संख्या चार कोटीवर आहे.

**कोविड काळात नवे प्रश्न**

विशेषतः महाराष्ट्रात व देशात कोविड संकट असल्याने स्त्रियांचे सर्वच जीवनावर परिणाम व बदल झालेला दिसत आहे. पुरुष वर्गाची वर्कफॉर्महोम अंगवळणी पडू लागली आहे. जगभरात संयुक्त राष्ट्र संघाच्या महिला विभागाने स्पष्ट केले आहे की कौटुंबिक हिंसाचार वाढत आहे रस्त्यावरचे बलात्कार नोंद घेण्याचे प्रमाण कमी झाले तरी तक्रार नोंदवायला जागा नाही कोर्ट बंद असल्याने तारखा मिळत नाहीत सोसायट्यांमध्ये खटके उडत आहेत अशा तक्रारी एकीकडे येत आहेत त्याच सोबत असंघटीत क्षेत्रातील महिला कामगार बारा बलुतेदार भाजी वाल्या, इस्त्री वाले, डबेवाले, सर्वांचे रोजगार ठप्प आहेत.

भूकंप महापूर नंतर त्या देशात पुनर्वसनाचे जितके गंभीर प्रश्न उभे राहतात तितकेच गंभीर प्रश्न जागतिक महामारी कोरूना ची लाट ओसरल्यानंतर निर्माण झाले आहे ज्यात विधवांचा अतिशय गंभीर मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे, विधवा महिलांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करत आहे. पतीच्या निधना नंतर आज ही महिलांना उपेक्षित जीवन जगावे लागते .त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. विधवा या एकल महिला गटात मोडतात अगदी स्वतःच्या कुटुंबातून आणि समाजातून या महिलांकडे पाहण्याचा

दृष्टिकोन बदललेला असतो. समाजातील प्रवृत्ती वाईट नजरेने बघते अशा वेळी महिलांना प्रचंड मानसिक ताण तणावातून जावे लागते या शिवाय त्यांच्या रोजी-रोटी पासून ते मुलांच्या संगोपनाची प्रश्न सोडवतात दमछाक होते म्हणूनच शासनाने विशेष धोरण आखून त्यांच्या आरक्षणासाठी कायदेशीर तरतूद करण्याची गरज आहे यासाठी "यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान" मुंबई आणि "विकास अध्ययन केंद्र" मुंबई या संस्थांनी अत्यंत सूक्ष्म अभ्यास करून धोरण तयार केले आहे लवकरच शासना पर्यंत हे धोरण पोचविण्यात येणार आहे.

घराचा मालकी हक्क नाही पतीच्या संपत्तीत वाटा मिळण्यासाठी दीर्घकालीन लढाई कमी झाल्यास अत्याचारांना सामोरे जावे लागते. दुसरे लग्न केले तर मुलांवर चा हक्क सोडावा लागतो वृद्ध विधवा स्त्रियांना कुटुंबास स्वीकारले जात नाही. कमी वयातील विधवांना शारीरिक, मानसिक व्याधी जडण्याचा धोका नैराश्याचे प्रमाण अधिक वाढते काय करावे शासनाने विधवा परिपक्वता आणि घटस्फोटित महिलांसाठी धोरण राहण्यासाठी जीवन जगण्यासाठी शेतजमीन घरकुल योजना मध्ये प्राधान्य अन्न सुरक्षा योजनेचा लाभ दारिद्र्यरेषेखालील रेशन कार्ड सर्व शासकीय योजनांचा लाभ मुलांसाठी शिक्षण हक्क कायद्यातील 25 टक्के आरक्षण आरक्षणात प्राधान्य शासकीय रोजगार नोकरीच्या ठिकाणी विशेष आरक्षण देणे महत्त्वाचे आहे.

करोना या जागतिक महामारीने जगात अभूतपूर्व पूर्ण खळबळ माजवली आहे. साऱ्या जगाच्या नाड्या आवळल्या गेल्या आहेत. हसणारे, खेळणारी, सातत्याने धावणारे, कायम आनंदाच्या शोधात असलेले हे जग आज लंगडत आहे. ते आमूलाग्र किंवा अंतर्मुखी ही झाले आहे. ते केवळ मृत्यूच्या भयाने च नव्हे तर भविष्य ही आज अंधारलं म्हणूनच चीनच्या वूहान प्रांतातून हा व्हायरस निर्माण झाला आणि जगभर पसरला आहे. जी राज्य सतर्क होती तिथे त्याने प्रवेश केला नाही .किंवा प्रवेश केला तरी पसरला नाही चीन मध्ये तो आज नाही. जपान मध्ये नाही. न्यूझीलंड मध्ये पूर्ण विजय मिळविला बाकीची ही राज्य सावध होऊन त्याचा प्रतिकार करीत आहे. पुढे मागे जग नष्ट झाले तर ते अनुबॉम्बमुळे नाही तर अशाच कुठल्यातरी जैविक आपत्ती मुळे ज्याला सर्वजण शक्तिमान मानतात ती अमेरिका ही हतबल आणि भयग्रस्त आहे त्यामुळे कोरोना नंतरचे जग हे आणि करुणा नंतरच्या भारत अशी विभागणी करावी लागते. आजच्या विज्ञान युगातही एखादा व्हायरस आपण आतून किती दुर्बल आहोत याची आठवण करून देतो. विज्ञानामुळे माणसाच्या मनातील मृत्यूचे सर्वकालिक भय नष्ट झालेलं नाही उलट आज जगभराच्या माणूस अधिक भयग्रस्त झाला आहे शासन देखील अशा वेळी हतबल होते त्याची अनेक कारणे आहेत. जगातील सर्व मुख्य समस्या भ्रष्ट राजकीय व्यवस्था व प्रशासन यामुळे निर्माण झालेल्या आहेत त्याची कारणे देखील वेगवेगळी आहे ती यापूर्वी जगात आणि भारतात अनेक महामारया येऊन गेल्या आहेत लक्षावधी नव्हे तर करोडो लोक त्यात मेले आहेत त्यावेळी विज्ञान बाल्यावस्थेत होते त्यामुळे हे येणारे संकट ईश्वराच्या अवकृपेमुळे आले आहेत असे लोकांना वाटत होते हे जग कार्यकार संबंधांवर उभे आहे आणि प्रत्येक गोष्टीला कारण असते हा बुद्धीचा अडीच हजार वर्षापूर्वीचा सिद्धांत आज ही भारतीय लोकांना पेलवत नाही त्यामुळे रोगांवर औषध शोधून काढावे असे कुणाला त्यावेळी वाटत नाही भारतात दारिद्र्य अज्ञान अंधश्रद्धा जातीयता आणि दैववाद ही कथा यामुळे मृत्यूचे प्रमाण खूपच होते आज आपल्या रेट सातत्याने वाढत आहे हे विज्ञानाचे यश आहे भारतात येऊन गेलेल्या प्लेग कालरा देवी मानमोडी टाइफाइडया या साथीनी मागील शतकात धुमाकूळ घातला होता जगातही त्यावेळी अशा साथी आल्या होत्या व शेकडो लोक त्यात बळी पडले होते रोग कशाने होतो हेच माहिती नसल्यामुळे तर्क वितर्क व अफवांना उधाण येत होते एकेकाळी लंडन शहर कॉलऱ्याच्या साथी पूर्ण उद्ध्वस्त झाले होते लंडन ची लोकसंख्या निम्म्याने घटली होती. लोक कॉलरा होऊ नये म्हणून अंगावर चिलखत घालून हिंडत असतात हा रोग पाण्यातून येतो हे त्यांना माहितीच नव्हते अज्ञान हेच सर्व समस्येचे मूळ कारण आहे या साथी मुळे जगाचे अतोनात नुकसान वेळोवेळी झालेले आहे त्यामुळे मानव जातीच्या एकूण सामाजिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

व्यवस्था वेळोवेळी बदलले आहेत माणसाच्या वेळी अधिक धार्मिक होतात हा आजार परधर्मी यांमुळे आला अशी अफवा पसरवून त्यावर विश्वास ठेवून त्यांनी त्यांचे अनेकदा बळी घेतले आहेत भीतीने मोठ्या प्रमाणात लोकांनी स्थलांतरही केले आहे यासाठी शेवटी का निर्माण होतात असा प्रश्न निर्माण होतो कधी कधी ते निसर्गाने केलेले बँडच असते. निसर्ग नेहमीच मानव जातीला अनुकूल राहिलेला नाही. निसर्गात असंख्य जिवाणू आहेत की, जे सतत आपल्या सभोवती असतात. काही आपल्या आरोग्यासाठी अनुकूल ही असतात परंतु, त्यातील काही प्रतिकूल जिवाणू एखाद्या ठराविक वेळेलाच जणूकाही ठरून केल्याप्रमाणे ते मानवाला मानवावर हल्ला करतात याचा उलगडा अद्याप विज्ञानाला झालेला नाही. जगभराच्या या साथीच्या आपण अभ्यास केला तर काही ठराविक वर्षानंतर या जागतिक महामारी उद्भवतात आणि जगाला गंभीर जखमी करतात असे आढळून आले आहे.

नाशिक चांदवडच्या दवाखाण्याच्या आवारात ऑक्सिजन बेड न मिळाल्याने तडफडत मरणाऱ्या व्यक्तीचा आणि त्याच्या जीव वाचववा म्हणून जीवाच्या आकांताने रडतच मदत मागाणाऱ्या त्याच्या आप्त स्त्रीचा (पत्नीचा ) व्हिडीओ बहुतेकांनी बघितला असेल हा मुत्युमूखी पडलेला व्यक्ती नामांकित वडनेर भैरव या सधन शेतकऱ्यांच्या गावातील आहे. १७ हजार लोकसंख्या असलेल्या आणि व्यावसायिक डॉ. माजी आमदार देणाऱ्या ह्या गावात सध्या मुलभूत वैद्यकिय सुविधाही गेल्या 30 वर्षात उभ्या राहू शकल्या नाहीत अशा अनेक रुग्णांना तातडीने योग्य वैदयकिय उपचार न मिळाल्याने तडफडत जीव सोडावा लागला व अनेक स्त्रीयांना दुर्देव विधावा होऊन संकट ,कष्टमय, जीवन जगावे लागत आहे.

२५ वर्षाची निलम कोविडमुळे तिचा पति गेला ती मुलगी आणि पती नाशिकला भाड्याच्या घरात राहत होते. घर मालकाने सुरुवातीला एक- दोन महिने घर भाडे मागितले नाही. पण नंतर तगादा लावला घर भाडे दिले नाही. म्हणून तिचे सामान ठेऊन घेतले आणि मुला सहित तिला घर सोजयला भाग पाडले घर भाडयाचे पैसे दिल्यावर सामान घेऊन जा म्हणून तिला सांगितले निलम खेडे गावातील लग्नाला 3 वर्ष झाली होती. मुलगा लहाण होता नोकरी साठी शहतात राहत होते. गावाला व सासरच्या परीवाराचा फारसा अनुभव नव्हता अशा निलम ला अनेक समस्या ना सामोरे जावे लागत आहे.

व्यक्तीच्या जीवनातील आदयसंस्था म्हणून कुटुंब संस्थेचा उल्लेख करता येईल. कौटुंबिक घटनांचा व्यक्तीवर पडणारा प्रभाव हा दीर्घकाळ टिकणारा असतो .कुटुंबाचा आकार आई वडील आपल्या मुलांवर होणारे संस्कार कुटुंबाची विचारसरणी इत्यादींचा व्यापक प्रभाव मुलांवर पडत असतो. कुटुंबामध्ये कशा तऱ्हेचे व्यवहार घडतात यावर बालकांचे सामाजीकरण अवलंबून आहे.अशा परिस्थितीत एखाद्या कुटुंबातील एखाद्या स्त्री चा पतीचे निधन झाले असेल मुलांना वडील नसतील अशा कुटुंबाला, सामाजिक, कौटुंबिक अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. समाजात पूर्वी पासून स्त्रीचे स्थान दुय्यम राहिले आहे. बदलत्या काळात काही सुधारणा झाल्या असल्या तरी मानसिकता अजूनही पूर्णपणे बदललेली नाही. त्यामुळे समाजात नव्याने निर्माण झालेल्या covid-19 विधवा स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

कुटुंब व्यवस्था हा आपल्या कडील महत्त्वाचा सामाजिक घटक आहे .आणि त्याबद्दल अनेक जण अभिमानाने बोलत ही असतात या व्यवस्थेचे फायदे तोटे आहेत. परंतु या व्यवस्थेमुळे समाजाचा डोलारा उभा आहे हे नाकारता येणार नाही. चंगळवादी संस्कृती मुळे या व्यवस्थेला धक्के जरूर बसत आहे. परंतु त्याची पाळेमुळे घट्ट असल्याने तडे गेलेले नाही. स्त्री आणि पुरुष ही संसार "रथाची दोन चाके" असल्याचे म्हटले जाते. खरे परंतु संसाराचा तोल सावरला जातो. तो स्त्रीमुळेच पुरुष सत्तेने स्त्रीला कायमच कमकुवत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. हजारो वर्ष शिक्षणापासून वंचित ठेवले आताशी कुठे तिला कायद्याने हक्क मिळू लागले आहेत .त्या आधारे ती आपली प्रगती करीत आहे बुद्धिमत्तेच्या बाबतीत आपण पुरुषांपेक्षा कमी नाही हे ती सिद्ध करीत आहे. स्त्री म्हणजे त्यागाची मूर्ती परमेश्वराचे रूपच जणू स्त्री म्हणजे सहनशीलतेचा कळस संसारात तिचे

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

अस्तित्व प्रकर्षाने जाणवते ती नसेल तर कुटुंब कोमेजले रात्रंदिवस कष्ट करून कुटुंबाचा डोलारा सांभाळते पण आपल्या मुलाबाळांना त्याची झळ पोहोचू देत नाही. संसार काही कसाही असला तरी गळ्यातला हार मानून त्याचा स्वीकार करते. आजती चूल व मूल सांभाळून पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे याच काळात covid-19 जागतिक महामारी ने तिच्यापुढे विधवा म्हणून जगण्याचा नवा प्रश्न नवी समस्या नवी जबाबदारी उभी आहे. समाजात उभे राहायचे आहे आणि ते ही कुणाचा आधार नसताना प्रथम कुटुंबासाठी स्वतःच्या अपत्यासाठी या नव्या समस्यांना आव्हानांना तिला सामोरे जायचे आहे. व नवा संघर्ष करून या विधवा स्त्रियांना जिंकायचे आहे. व आपले आयुष्य उभे करायचे आहे आपल्या अपत्यांना संस्कार देऊन त्यांचे आयुष्य घडवून त्यांना उभे करण्याचा संघर्ष या विधवा झालेल्या स्त्रियांपुढे आहे.

**जगात व भारतात देशात covid-19 जागतिक महामारी ची दुसरीजीवघेणी लाट व तिचामुळे झालेला परिणाम**

या वेळी देशात मोठ्या प्रमाणात लसीकरण होऊ शकले नाही त्याचा वेगळाच दुष्परिणाम दुसऱ्या लाटेत जाणवू लागला आहे. पहिल्या लाटेत प्रामुख्याने वयोवृद्ध व वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त असलेल्या बाधितांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त होते. आणि संसर्गाचा प्रादुर्भाव शहरी भागावर होता. परंतु आता दुसऱ्या लाटेतला संसर्ग ग्रामीण भागांना व्यापून फैलावणारा आहे .हे स्पष्ट दिसत आहे. या साथी मध्ये एप्रिल महिन्यातील तीस ते पन्नास या वयोगटातील तरुण अधिक प्रमाणात बाधीतहोऊन अकाली मृत्युमुखी पडले आहेत. यात उत्परिवर्तन (म्युटेशन झालेल्या) व्हायरसच्या धोक्याचे प्रमाण किती? याचा बारकाईने अभ्यास व्हायला पाहिजे. व्हायरस किती ही घातक असला तरी आपल्या बिकट हलाखीच्या व अत्यंत थोडक्यात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे दोष हा अधिक चिंतनीय विषय आहे हे ही खरे आहे. की आता संसर्ग होणार हा विषाणू अधिक क्षमतेच्या असल्याचे शास्त्रज्ञ सांगत आहेत. या व्हायरसचे किमान दोनदा तरी म्युटेशन झालेले असल्याने त्या वरील अदयावर संशोधनही सुरू आहे. ते पूर्णत्वाला आलेले नाही यामुळे या व्हायरसला नियंत्रित करणे अत्यंत आव्हानात्मक काम मानले जात आहे. ज्या वेळी आपल्याकडे कोरोना बाधितांची संख्या वेगाने वाढत आहे. त्या वेळी या व्हायरसचे नवीन वेरिएन्टस तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असा नवीन वेरिएन्टस असलेल्या म्युटेशन असलेल्या म्युटेशन व्हायरस फैलावला तर लसीची प्रतिकारकता निष्प्रभ करू शकतो. ही वैज्ञानिक माहिती जगभरात सर्वप्रथम पोहोच आहे.

करोना काळात गमावलेल्या महिलांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन कोरोना काळात समाजातील अनेक कुटुंबातील मोठ्या प्रमाणात हानी झाली. अनेकांना आपल्या प्रियजनांना गमवावे लागले काही कुटुंबांमध्ये कुटुंबप्रमुखाचे निधन झाले त्यामुळे दुःख बरोबरच कुटुंबाची जबाबदारी अचानक विधवा पत्नीवर येऊन पडली अशी अनेक कुटुंब आपल्या नातेवाईक मित्र जन ओळख मध्ये दिसत आहे.

**उपाय**

1. सासरच्या मालमत्तेत व माहेरच्या मालमत्तेत विधवा झालेल्या स्त्रियांच्या व त्यांच्या मुलांचा हक्क अधिकार शाबूत राहील याकडे लक्ष देणे.
2. शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती व त्या विविध योजनेत या विधवा महिलांना प्राधान्यक्रम देणे गरजेचे आहे.
3. कोरोन काळात विधवा झालेल्या विधवांते पुनर्वसन हा आपला सामाजिक संस्थांचा आणि महिला संघटनेच्या कार्याचा प्रमुख भाग आहे.

**संदर्भ सूची**

1. आगलावे प्रदीप ‘भारतीय समाजप्रश्न आणि सामाजिक समस्या”
2. साईनाथ प्रकाशन - नागपूर
3. डॉ.कांबळे नारायण- समाजशास्त्र संशोधन पत्रिका प्रकाशक श्री पवन गजलवार नागपूर

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

4. मराठी समाजशास्त्र परिषद
5. प्रज्ञा दया पवार - परिवर्तनाचा वाटसरू
6. अभय कांता
7. लोकराज्य
8. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन
9. मे .मुद्रण. प्रिंट.एन पॅक प्रा लि  कोपरखैरणे नवी मुंबई.
10. विकिपीडिया
11. लोकमत न्युज पेपर
12. अण्णाभाऊ साठे लिखित "श्री संघर्षगाथा" डॉ. उज्वला हातागळे
13. महाराष्ट्र टाइम्स "स्त्री शक्ती आणि समाज"

***Cite This Article:***

**प्रा. हर्षला सूर्यवंशी**, *(2022).* जागतिक महामारी आणि विधवा महिलांच्या समस्या, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 270-276.*